**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 14.01.2025** **वार - मंगळवार**

---

**<u>लष्करदिन</u>**

७७ वा लष्कर दिन उद्या पुण्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर भव्य संचलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत. तर संध्याकाळी होणाऱ्या गौरवगाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथसिंग यांची उपस्थिती असणार आहे. पुण्यात प्रथमच लष्कराचे संचलन होत असून यामध्ये लष्कर पोलीस दल आणि महाराष्ट्र एनसीसीचं महिला पथक सहभागी होणार आहे. त्याचबरोबर भारतीय लष्करात वापरली जाणारी शस्त्र आणि उपकरणं यांचाही संचलनात समावेश असणार आहे.

**<u>सैनि</u>**

देशात सव्वा कोटी माजी सैनिक, सैनिक आणि त्यांचा परिवार आहे. या मनुष्य बाळाचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी करता येऊ शकतो असं प्रतिपादन लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज पुण्यात केलं. ९ व्या सशस्त्र माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. कल्याणकारी योजने अंतर्गत १२०० लाभार्थींना ५८ कोटी रुपयांच्या निधीचं यावेळी वाटप करण्यात आलं. तसच २८ हजार माजी सैनिकांना रोजगार मिळावा यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात आलं असून २२ सामंजस्य करार करण्यात आल्याचं लष्कर प्रमुखांनी सांगितल. यावेळी वीर पत्नी तसच वीर सैनिकांच्या पालकांचा सत्कार द्विवेदी यांच्या हस्ते करण्यात आला.

**<u>एचएमपीव्ही</u>**

एचएमपीव्ही विषाणूच्या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळावर डॉक्टरांचे पथक सज्ज ठेवण्यात आलं आहे. कोणतीही लक्षणे आढळल्यास प्रवाशांवर येथे तत्काळ उपचार मिळणार आहेत. या विषाणूची तीव्रता कमी असली तरी विविध उपाययोजना केल्या जात असून प्रशासनाला या विषाणूच्या अनुषंगाने कोणत्याही सूचना आल्या नसल्या तरी सतर्कता म्हणून विमानतळावर डॉक्टरांचे पथक सज्ज ठेवण्यात आलं असल्याचं विमानतळ संचालक संतोष ढोके यांनी सांगितले.

**<u>म्हाडा-भूषण-प्रशांत</u>**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाकडून कोणत्याही व्यक्तीची प्रतिनिधी अथवा मध्यस्थ म्हणून नेमणूक केलेली नाही. घर मिळवून देतो, असे खोटे आश्वासन देऊन आर्थिक फसवणुकीच्या घटना घडत आहेत. या घटनांपासून सावध राहण्याचं आवाहन पुणे म्हाडाकडून करण्यात आलं आहे. मंडळातर्फे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिवे, सासवड, पिंपरी वाघेरे, महाळुंगे इंगळे आणि ताथवडे या ठिकाणी सदनिकांचे वितरण करण्यासाठी विपणन संस्थांची नेमणूक केली आहे. व्यवहार करताना मंडळाच्या मिळकत व्यवस्थापकांकडून पडताळणी करून घेण्याचं आवाहन म्हाडाच्या पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केलं आहे.

## पर्पल

पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने दिव्यांग बांधवांसाठी १७ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ काळवधीत पर्पल जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. दिव्यांग बांधवांना समाजाच्याव मुख्यल प्रवाहात आणून त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे.

## शिक्षणविवेक

शिक्षणक्षेत्रात सकारात्मक कार्य करणाऱ्या उपक्रमशील युवा शिक्षकांना शिक्षणविवेकतर्फे देण्यात येणारा शिक्षण माझा वसा २०२५ हा राज्यस्तरीय पुरस्कार यंदा राज्यातील १३ शिक्षकांना देण्यात येणार आहे. येत्या १८ जानेवारी रोजी पुण्यातील टिळक रस्त्यावरील मा स गोळवलकर गुरुजी विद्यालयाच्या गणेश सभागृहात हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार असल्याची माहिती शिक्षणविवेकचे प्रबंध संपादक दिलीप करंबेळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. वंदे मातरम्‌चे संशोधक-अभ्यासक मिलिंद सबनीस आणि सूचीकार शिल्पा सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बाबा शिंदे यांची प्रुमख उपस्थिती लाभणार आहे.

## संक्रांत

आज मकरसंक्रांतीचा सण पुण्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. यानिमित्ताने बाजारपेठा फुलल्या असून नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

## प्रशिक्षण

नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींवर नियंत्रण मिळवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या ५ दिवसीय अग्निशमन आणि आपत्ती प्रतिबंधक प्रशिक्षण सत्राला आज सुरुवात झाली आहे. 17 जानेवारीपर्यंत हे प्रशिक्षण सुरू राहणार आहे. जपानमधील आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी कार्य करणा-या स्थानिक प्राधिकरण परिषदेच्या सिंगापूर प्रतिनिधी कार्यालयाच्या वतीने या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

## कबड्डी

23 व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे बारामती इथं आयोजन करण्यात आलं आहे. उद्यापासून 19 जानेवारी पर्यंत होणाऱ्या या स्पर्धेचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तर पारितोषिक वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. ऑलिम्पिकपटू स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन ‘राज्य क्रीडा दिन’ म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३० तर किमान तापमान १५ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.उद्या आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**